“ बदला घेण्यापेक्षा स्वत:ला बदलणे जास्त फायद्याचे आहे... ”



बहुजन सौरभ **संपादकीय**

# लोकशाहीच्या कसोटीचा क्षण

भारतीय लोकशाही आज एका निर्णायक वळणावर उभी आहे. या वळणावर मुख्य निवडणूक आयुक्तांचा कस लागतो आहे. संविधानाने दिलेली सत्ता ही निष्पक्षपणे, निडरपणे आणि न्यायाने वापरण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे. पण गेल्या काही वर्षांत दिसणारी त्यांची भूमिका ही बीजेपी आणि तिच्या मातृसंघटना आरएसएस यांच्या तालावर नाचणारी आहे, असा उघड संशय निर्माण झाला आहे. निवडणूक आयोगाने सत्ताधाऱ्यांविरुद्ध कारवाई करायची वेळ आली की कानावर हात आणि डोळ्यावर पट्टी, तर विरोधकांविरुद्ध लहानशा कारणावरही तुरुतुरु धावणारी चौकशी – हा दुहेरी मापदंड आता लपून राहिलेला नाही. नरेंद्र मोदी, अमित शाह आणि बीजेपीच्या प्रचारात होणारे आचारसंहितेचे उघड उल्लंघन आयोगाच्या नजरेतून ‘सुंदरपणे’ सुटते. त्याचवेळी राहुल गांधी, ममता बॅनर्जी किंवा इतर विरोधकांवर मात्र आयोगाचे हातोडे जोरात आपटले जातात. हीच का ‘निष्पक्षता’? आरएसएसचा अजेंडा देशावर लादण्याचा जो आराखडा आहे, त्याला संस्थात्मक आधार द्यायचे काम आज मुख्य निवडणूक आयुक्त करताना दिसतात. आयोग हे संविधानाच्या चौकटीतील ‘जनतेचे रक्षणकर्ते’ असायला हवेत, पण तेच जर सत्ताधाऱ्यांचे ‘पक्षपाती शस्त्र’ झाले तर लोकशाहीचा आत्माच गुदमरून मरेल. निवडणुका या जनतेचा हक्क आहेत. त्या प्रामाणिकपणे आणि भीतीशिवाय झाल्या पाहिजेत. पण आज परिस्थिती अशी आहे की जनतेला मतदानापेक्षा ‘मतांची मोजणी कोणाच्या आदेशावर वळते’ हा प्रश्न अधिक त्रास देतो. मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्या खुर्चीचा उपयोग संविधानासाठी करायचा की सत्ताधाऱ्यांच्या खूशीनुसार, हा निर्णय इतिहाससमोर देण्याची वेळ आली आहे. लोकशाहीचा हा कसोटीचा क्षण आहे. निवडणूक आयोग जर झुकला तर येणाऱ्या पिढ्या या संस्थेकडे कधीही आदराने पाहणार नाहीत. मोदी-शहा यांच्या हाताखाली नाचणारा, आरएसएसच्या संकेतावर पाऊल टाकणारा आयोग हा ‘संविधानाचा रखवालदार’ नसून ‘लोकशाहीचा गद्दार’ ठरेल. आज प्रश्न मुख्य निवडणूक आयुक्तांचा नाही, तर लोकशाहीच्या श्वासाचा आहे. आयोगाने जर अजूनही आत्मपरीक्षण केले नाही, तर भारतीय जनता निवडणूक आयोगाला इतिहासाच्या कचाट्यात फेकून देईल. आणि त्या दिवशी आयोगाच्या प्रत्येक अधिकाऱ्याचे नाव जनतेसमोर एका ‘संपूर्ण पतनाच्या’ साक्षीदार म्हणून कायमचे कोरले जाईल. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वक्तव्याने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार गुप्ता यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि भाजप-आरएसएसला थेट आव्हान दिले. त्यामुळे निवडणूक आयोगाची निष्पक्षता चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत राहुल गांधींवर दाखविलेला आक्रोश आणि आयोगावर पोलीस धक्का लागू शकत नाही असे केलेले विधान हे संशयास्पद वाटते. त्यामुळे आयोगाचा पक्षपात होत आहे का, हा प्रश्न जनतेसमोर उभा राहिला आहे. दरम्यान बिहारमध्ये राहुल गांधी व तेजस्वी यादव यांच्या पदयात्रेला मिळालेला प्रचंड प्रतिसाद हा लोकांच्या असंतोषाचा पुरावा आहे. राहुल गांधींनी नागरिकांना आवाहन केले की, जर अन्याय झाल्यास थेट तक्रार नोंदवा. याचा अर्थ येत्या काळात भाजप-आरएसएसविरोधात हजारो गुन्हे नोंदवले जाऊ शकतात. कायद्याने मॅजिस्ट्रेटकडे दाद मागण्याचा मार्ग खुला असल्याने हा मुद्दा गंभीर ठरू शकतो. निवडणूक कायद्यानुसार आयोगाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही होऊ शकते व पक्षाची मान्यता रद्द करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भाजपसारख्या मोठ्या पक्षासाठी हा इशारा धोक्याचा आहे. इतिहास साक्ष देतो की अन्यायाचे साम्राज्य दीर्घकाळ टिकत नाही. मालेगाव बॉम्बस्फोटानंतर दहशतवादी हल्ले थांबले, पण त्या घटनेत अडकलेल्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. अशा घटनांनी हेच दाखवून दिले की सत्ता टिकवण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग अवलंबला तर शेवटी त्याचा अंत निश्चित असतो. आज ईव्हीएम आणि मतदान प्रक्रियेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. भाजप-आरएसएसच्या वर्तनामुळे त्यांच्या मनात असुरक्षितता वाढल्याचे दिसते. लोकशाही टिकवायची असेल तर सत्ता ही केवळ जनतेच्या विश्वासावर आधारित असली पाहिजे. विश्वास तुटला, तर कितीही मोठा पक्ष असला तरी त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. ■ ■

**श्रद्धांजली विशेष**

# शेतकऱ्यांसाठी जगलेले जीवन
# भूमीपुत्र अमिताभ पावडे

नागपूरच्या धंतोली भागातून सोमवारी संध्याकाळी एक काळीज पिळवटून टाकणारी बातमी आली. ज्येष्ठ कृषी अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी आणि समाजाभिमुख कार्यकर्ते अमिताभ पावडे आपल्यात राहिले नाहीत. एका अपघाताने त्यांचे जीवन थांबले, पण त्यांनी केलेले कार्य कायम स्मरणात राहील. विदर्भाची भूमी ही शेतकरी संघर्षांनी समृद्ध आहे. या मातीत अनेक लढाऊ नेते झाले, ज्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आपले आयुष्य झोकून दिले. त्या परंपरेतले एक निस्सीम कार्यकर्ते म्हणजे ज्येष्ठ कृषी अभ्यासक आणि शेतकरी चळवळीचे ज्ञात-अज्ञात मार्गदर्शक अमिताभ मोतीरामजी पावडे. अपघाती निधनाने त्यांचे जीवनकर्म थांबले, पण त्यांनी मागे ठेवलेली ठसे उमटवणारी वाटचाल ही येणाऱ्या पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखी आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोतीरामजी पावडे व संस्कृत पंडिता डॉ. कुमुद पावडे यांचे ते सुपुत्र होते. अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले होते. नॅशनल ॲथोरिटी ऑफ इंडियाचे माजी कार्यकारी अभियंता असलेले अमिताभ पावडे जवाहर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते. तसेच ते जनमंचचे सक्रिय सभासद होते. शेतकऱ्यांच्या समस्यांवर लढा देणारा भूमीपूत्र आणि हाडाचे शेतकरी अशी त्यांची ओळख होती. अमिताभ पावडे यांचा अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळ, पूर्वोत्तर प्रांतातील 24 विमानतळे तसेच भोपाळ व इंदूर विमानतळ बांधणीमध्ये सहभाग होता. रनवे, टर्मिनल, शासकीय व रहिवासी इमारती, टॉवर्स, रडार, टॅक्सीवे आदी बांधकामातही त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. 1998 पासून शेतकरी व चळवळीतील कार्यकर्ते म्हणून ते सक्रीय झाले. शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनेक जागरुकता कार्यक्रम राबवले. प्रयोगशील शेतकरी अशी त्यांची ओळख होती. सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. अभियांत्रिकी क्षेत्रात यशस्वी कारकीर्द असूनही, अमिताभ पावडे यांनी शेतीशी असलेली नाळ कधीच तोडली नाही. विमानतळ बांधणीसारख्या आधुनिक प्रकल्पांत सहभाग असलेले पावडे, त्यांनी अभियंता म्हणून मोठी पदे भूषवली, विमानतळासारख्या भव्य प्रकल्पात सहभाग घेतला, तरी मनाच्या गाभाऱ्यात ते सदैव शेतकरीच राहिले. मातीशी असलेले नाते हे त्यांच्यासाठी अभिमानाचे होते. धान्याच्या प्रत्येक दाण्यात त्यांनी कष्टाचे आणि विज्ञानाचे नवे धडे जोडले.

**शेतकऱ्यांचा आधारस्तंभ :-** अमिताभ पावडे हे केवळ अभ्यासक नव्हते, तर शेतकऱ्यांच्या दु:खाचे खरे सखेसुद्धा होते. त्यांनी हमीभाव, कर्जमाफी आणि शेतीत तंत्रज्ञान यांसाठी आवाज उठवला. गावोगाव फिरून शेतकऱ्यांना जागे केले. चळवळीत राबताना त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच निर्धाराचा तेज दिसायचा. शेतकऱ्यांचा संघर्ष त्यांनी स्वतःचा मानला. म्हणूनच ते सर्वांच्या मनात घर करून गेले. त्यांच्या मते, ‘शेती हा व्यवसाय नाही, तर जीवनाचा श्वास आहे’. त्यामुळेच ते केवळ अभ्यासक राहिले नाहीत, तर प्रत्यक्ष राबणारे, प्रयोगशील शेतकरी म्हणून सर्वांसमोर आले. 1998 पासून शेतकरी चळवळीत उडी घेतल्यावर त्यांनी शेतकरी समस्यांवर चर्चा व जागरूकता मोहीमा चालवल्या, शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी, शेततळी निर्मिती यांसारख्या मुद्द्यांवर लढे दिले, आंदोलनाच्या आघाडीवर राहूनही त्यांनी संवादाला जास्त महत्त्व दिले. शेतकऱ्यांचा विकास हा वैज्ञानिक दृष्टीकोनातूनच होईल यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

**अखेरचा निरोप :-** आज विदर्भातील शेतमालक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांना जवळून ओळखणारे असंख्य लोक अश्रू ढाळत आहेत. धंतोलीच्या गल्लीपासून मोक्षधाम घाटापर्यंत एकच स्वर घुमतो आहे, ‘अमिताभ दादा, तुमची उणीव कधीच भरून निघणार नाही!’ अमिताभ पावडे यांचे अचानक झालेले निधन हा विदर्भासाठीच नव्हे, तर देशातील शेतकरी चळवळींसाठीही मोठा धक्का आहे. त्यांची प्रयोगशीलता, लढाऊ वृत्ती आणि निःस्वार्थ सेवाभाव हे नेहमीच प्रेरणादायी राहतील. आज शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी समुदाय त्यांना अश्रूपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहेत.

भूमीपुत्र, शेतकऱ्यांचा सखा आणि समाजकारणाचा दीपस्तंभ, अमिताभ पावडे यांना कृतज्ञ अभिवादन!

**– संध्या राजुरकर**
निवासी संपादक

## ज्येष्ठ कृषी अभ्यासक अमिताभ पावडे यांचे अपघाती निधन आज अंत्यसंस्कार

ज्येष्ठ कृषी अभ्यासक आणि चळवळीतील कार्यकर्ते अमिताभ मोतीरामजी पावडे यांचे आज ( सोमवार 18 ऑगस्ट) अपघाती निधन झाले. ते 61 वर्षांचे होते. दुचाकीने जात असताना धंतोली येथील त्यांच्या राहत्या घराजवळच दुपारी हा अपघात झाला. त्यांना लगेच धंतोलीतील इस्पितळात दाखल करण्यात आले, मात्र अती रक्तस्त्रावामुळे त्यांचे निधन झाल्याचे कळते. बुधवार 20 ऑगस्ट रोजी दुपारी 12 वाजता मोक्षधाम घाटावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे पत्नी संजीवनी, परदेशात स्थायिक असलेली मुलगी, एक मुलगा व बराच मोठा आप्त परिवार आहे.



# पुन्हा एक अपघाती मृत्यू

नागपूर परिवर्तनवादी चळवळीतील एक ज्येष्ठ विचारवंत, शेतकरी नेते व लेखक, समाज सेवक इंजि. शिवश्री अमिताभ पावडे यांच्या अपघाती निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक, क्लेशदायक व दुःखदायक आहे. शब्दात व्यक्त करणे अवघड आहे. टाळता येण्यासारखे असे अपघात समाजाला नुकसानकारक ठरतात. काही महिन्यांपूर्वी मराठा सेवा संघाच्या बळीराजा संशोधन संस्था नागपूर येथे आमची मराठा सेवा संघ बळकटीकरण व नवीन पिढीतील युवकांना जोडण्यासाठी उपयुक्त ठरेल असा कृतीशील उपक्रम नियोजन व आयोजन करण्याबाबत बैठक झाली होती. याशिवाय कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी शेतकरी संवाद साधून स्वयंपूर्ण शेती व्यवसाय उभारणी करणे शक्य आहे असे त्यांनी सांगितले होते. त्यांच्या ज्ञानाचा सदुपयोग करून योग्य काम करण्याबाबत चर्चा झाली होती. ती चर्चेतच राहिली. भारतीय विमानतळ प्राधिकरणमध्ये कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असतांना स्मृतीशेष शिवश्री इंजि. अमिताभ पावडे यांनी दोन डझनभर विमानतळ व अन्य बांधकामांचे निर्माणात सहभाग दिला होता. कुणबी मराठा बहुजन समाजातील विद्वान व बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा अवघ्या 61 व्या वर्षी अपघाती मृत्यू अनाकलनीय आहे. अत्यंत दुर्दैवी आहे. ज्ञानभांडार नष्ट झाले आहे. अशा दुर्घटना घडल्यानंतर आम्ही काही दिवस हळहळ व्यक्त करतो. परंतू असे होऊ नये यासाठी कृतिशील उपाय अंमलात आणत नाही. अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाय अंमलात आणले पाहिजेत. गेल्या काही वर्षांपासून शहरातील व रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था कोलमडून पडली आहे. नवनवीन दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी वाहनांची रेलचेल असते. नवीन भर पडत आहे. तरुणाईला भुरळ पडली आहे. त्यांना वेळ नसतो. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांनी स्वतः दोन चाकी वा चार चाकी वाहन न चालवणे हाच पर्याय आहे. तसेच किरकोळ कारणासाठी घरातून बाहेर पडताना एकटेच जाऊ नये. दोन चाकी वाहनांवर मागे बसूच नये. जायचेच असेल तर आटोरिक्षा किंवा टॅक्सी करुन जावे. यापूर्वी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून अनेकदा निवेदन देण्यात आले आहेत की आपली आर्थिक, सामाजिक उंची निर्माण झाली आहे. याच कारणाने स्वतःची चार चाकी गाडी विकत घेऊ नये. स्वतः चालक होऊन चालवू नये. शक्यतोवर भाड्याची गाडी वापरावी. कारण गाडी चालविणे हे एक चालकाचे अत्यंत कौशल्याचे वैशिष्ट्य असते. आम्ही मोठे उद्योजक व्यापारी डॉक्टर, इंजिनिअर, वकील म्हणून निष्णात असतो. पण प्रशिक्षित चालक नसतो. एकेकाळी अंगावर चांगले कपडे नसणारे, पायात चप्पल नसणारे अनेक सहकारी उच्च शिक्षण वा स्वकौशल्याने कष्टाने श्रीमंत होतात. अशावेळी चारचाकी गाडी असणेही गरजेचे असते. परंतू त्यासाठी एक दोन कुशल चालक असावेत. चालकास आपल्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून वागवावे. आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो की रोजगार निर्मिती केली पाहिजे. मराठा सेवा संघाचे अनेक सहकारी स्वतः गाडी चालवताना अपघातात मृत्युमुखी पडलेले आहेत. इंजि. अमिताभ पावडे यांच्या निधनामुळे केवळ पावडे कुटुंबीय, मंडळी, नातेवाईक नव्हे तर सर्वच वर्गाला व समाजाला अत्यंत दुःख झाले आहे. एकसष्ठी म्हणजे वयाची दुसरी इनिंग सुरू होते. आम्ही सर्वच पावडे कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. जिजाऊ सर्वांनाच सावरण्यासाठी बळ देवो हीच जिजाऊ चरणी प्रार्थना .. स्मृती शेष इंजि. शिवश्री अमिताभ पावडे यांच्या पावन स्मृतींना मराठा सेवा संघ व आमच्या खेडेकर कुटुंबियांच्या वतीने भावपूर्ण शिवांजली अर्पण. महत्वाचे म्हणजे स्मृती शेष इंजि. शिवश्री अमिताभ पावडे यांना शिवांजली अर्पण करताना आम्ही सर्वांनीच व विशेषतः ज्येष्ठांनी काळजी घ्यावी की अत्यंत महत्वाच्या कामाशिवाय घरातून बाहेर पडणार नाही. स्वतः वाहन चालवणार नाही. नवीन चारचाकी वाहन विकत घेतले तर सर्वप्रथम मालकीची गॅरेज व्यवस्था करुन पूर्णवेळ कुशल चालकाची नेमणूक करेन इत्यादी. यामुळे रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होईल व अपघाती मृत्यू देखील कमी होतील. हीच इंजि. शिवश्री अमिताभ पावडे यांना शिवांजली ठरेल.

**– पुरुषोत्तम खेडेकर**

# अमिताभ पावडेंचे आकस्मिक जाणे यातनादायी...

काही मृत्यू प्रश्नांकितही करतात, उद्विग्नही करतात आणि अंतर्मुखही करतात. काही मृत्यूंचा आपल्याला रागही येतो. अमिताभ पावडेंच्या आकस्मिक मृत्यूचा मला असाच राग आला. पुढले तीसपस्तीस वर्षांचे अमिताभ पावडेंचे तेजस्वी जगणे अविचारी अपघाताने मिटवूनच टाकले. जोतीराव फुल्यांनी मांडून ठेवलेल्या सर्वधर्मी एकमय कुटुंबात ते जन्मले आणि वाढले. कुमुदताईंनी आणि मोतीरामजींनी अमर्याद उजेड या अर्थाने त्यांचे अमिताभ हे नाव ठेवले. अमिताभ पावडे हे एका मेहनती प्रयोगशाळेचेच नाव होते. शेती, पर्यावरण आणि विमानतळांसारख्या भव्य वास्तूंच्या निर्माणांमधून प्रकट झालेली त्यांची सर्जनशील प्रज्ञा दुर्मिळच होती.

अमिताभ पावडेंसोबत शेतकऱ्यांच्या, गोसेखूर्दच्या आणि नागरीकत्व निर्धारणाशी संबंधित काही आंदोलनांमध्ये सहभागी होता आल्याच्या आठवणी आता डोळ्यांपुढे उभ्या राहिल्या आहेत. अमिताभ प्रज्ञावंत होते, प्रयोगशील होते आणि पुनर्रचनावादी होते. त्यांच्या या प्रयोगशाळेचे झुंबर काल दि. 19 ऑगस्ट 2025 रोजी झालेल्या अकाली मृत्यूमुळे कोसळले. त्यांची तैलबुद्धी, असीम विनम्रपणा आणि नितळ माणूसपण या तेजस्वी गोष्टी कोणीही विसरू शकणार नाहीत.

**– यशवंत मनोहर**

# अमिताभ पावडे हे आमचे बौद्धिक मिशनरी मित्र !

अमिताभ पावडे हे आमचे बौद्धिक मिशनरी मित्र आहेत. मी भूतकाळाचा वापर करू शकत नाही. कारण त्यांच्या अपघाती मृत्यूला स्वीकारणे माझ्यासाठी खूप कठीण आहे. धक्का असतानाही मी ए. प्रदीप नागरारे आणि ए. अरविंद गेडाम यांच्याकडून चौकशी केली. आम्ही सामान्य मित्र आहोत. ज्वलंत विषयांवर अमिताभ भाऊ आणि त्यांचे मित्रमंडळ ए. नगरारे यांच्या कार्यालयात एकत्र येत असत आणि शेती, कृषी आयोग, स्वामीनाथन समिती इत्यादी विषयांवर चर्चा करत असत. त्यांनी सखोल ज्ञानाने भाग घेतला. त्यांचे अकाली निधन हे आपल्या सुधारकांच्या मिशन आणि चळवळीचे अचानक आणि विनाशकारी नुकसान आहे. ते त्यांच्या नैसर्गिक शिष्टाचाराने आणि सत्यासाठी दृढतेने बोलत असत. बौद्धिक प्रामाणिकपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुर्मिळ गुण आहे. आपल्याला जीवनचक्र माहित आहे.

मला मृत्यूचे वास्तव आणि नश्वरतेचे सत्य माहित आहे. तरीही मी हे स्वीकारू शकत नाही की अमिताभ भाऊ कायमचे गेले आहेत. आपल्या जीवनाच्या प्रवासात त्यांचे स्थान कायमचे राहील.

**– कुलदीप रामटेके**



# धम्मपद म्हणजे सत्याचा खजिना

गाथा आणि कथा याचे या ग्रंथातील नाते महत्त्वपूर्ण आहे. सुगंधाशी फुलांशी, कमळाचे जलाशयाशी, संगीताचे सतारिशी जे नाते आहे तेच या गाथांचे त्या कथांशी नाते आहे, अल्फाक्षर रमनियत्व हे त्यांचे वैशिष्ट्य. नादमाधुर्य आणि अर्थ सौंदर्याचा संगम त्यामध्ये झाला आहे. या गाथेतील एका एका विचारांची मशाल अंधारग्रस्तांचा जीवन मार्ग उजळविणारी आहे. माणूस हा कथाप्रिय असतो. कथेचा चटकन परिणाम मनावर होतो. ग्रंथाशी निगडित या कथा उद् बोधक आहेत. मन प्रकाश मान करणाऱ्या आहेत. मानवी स्वभावाचे सुंदर नमुने या कथांत आहेत. या कथांतील माणसे आजही अवती भोवती आपल्याला भेटतात. मणूनच या कथा आजही ताज्या फुलांप्रमाणे टवटवीत वाटतात. महाप्रज्ञावंताच्या ओठातून आलेल्या ह्या गाथा आणि कथा असल्यामुळे त्यांना सोन्यापेक्षाही जास्त मोल आहे.

‘भगवान बुद्धांची साहित्यदृष्टी’ साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये कथन हा प्रकार महत्त्वाचा असतो. कोणते कथन करावे आणि कोणते कथन करू नये याविषयी भगवान बुद्धांनी ‘अंगुत्तर निकाय’ खंड 2 मधील मब्राम्हणवगोफ तील सुत्त सुत्तामध्ये महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. मगध महामात्य वर्षकार ब्राह्मणास भगवान बुद्धांनी जो उपदेश केला तो या सुत्तात आहे. कथन मग ते वाचीक असो की वांग्मयीन, दोन्ही साठी उपदेश लागू पडणारा आहे. या आधारे भगवान बुद्धांची कथा कथन दृष्टी म्हणजेच एका अर्थात साहित्यदृष्टीही प्रकटली आहे. कारण कथन साहित्याचे एक वैशिष्ट्य आहे. बुद्ध म्हणतात, ज्या ऐकलेल्या गोष्टीच्या कथनाने अशुभ-गोष्टींची वृद्धी होईल, शुभ गोष्टीची हानी होईल, अशी ऐकलेली गोष्ट कथन न केली पाहिजे असे मी सांगतो.

ज्या ऐकलेल्या गोष्टीच्या कथनाने अशुभ गोष्टीची हानी होईल, चांगल्या गोष्टीची वृद्धी होईल, अशी ऐकलेली गोष्ट कथन केली पाहिजे असे मी सांगतो.

आधुनिक मानसशास्त्र वर्तन हा शब्द वापरते. त्याऐवजी बुद्धाने मानवी व्यवहार हा शब्द वापरला आहे आणि मानसशास्त्रीय विचारांची मांडणी केली आहे. आज मनोविकार तज्ञ मेडिसिनचा उपाय सांगतात पण विकार मुक्तीसाठी मेडिसिन पेक्षा मेडिटेशन, विपश्यना ही मानवी दुःखावरची दवा बुद्धाने शोधून काढलेली आहे.

बुद्धाच्या अभिधम्मात मनाचे 121 प्रकार असून चित्तानुसार ह्या ध्यानात मनाच्या 16 बाजू वर्णिलयाआहे. 1) सराग, 2) वित्तराग, 3) सदोस, 4) वित्तदोस, 5) समोह, 6) वित्त मोह, 7) समरीकत, 8) विख्यित, 9) महगता, 10)अमहगता, 11) स उतरा, 12)अनुत्तरा, 13)संहिता, 14) असंहिता, 15) विमुक्त, 16)अविमुकत. म्हणजे किती सखोल चिंतन बुद्धांनी केले होते हे लक्षात येते. ■ ■

**तथागताची सत्यगाथा**



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

# स्त्रिया आणि अंधश्रद्धा

आज दि. 20 ऑगस्ट डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतीदिन आहे. दि. 20 ऑगस्ट 2023 रोजी डॉ. दाभोळकर यांचा स्मृतीदिवस शहीद दिन म्हणून घोषित करण्यात आला. त्यांना मरणोपरांत भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. परंतु आज त्यांच्या खुनाला 12 वर्षे झाली तरी त्यांच्या खुन्याना शिक्षा झाली नाही. 9 ऑगस्ट 1989 रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना डॉ. दाभोळकर यांनी केली आणि मरेपर्यंत त्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध जनजागृती केली. 26 ऑगस्ट 2013 ला तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांनी त्यांच्या मृत्यूपरांत जादूटोणा विरोधी कायदा 2013 चा अध्यादेश काढला आणि डिसेंबर 2013 ला विधानसभा व विधानपरिषदेत हा कायदा मंजूर करण्यात आला. 2015 ला जात पंचायत विरोधी कायदा देखील समितीला यश प्राप्त झाले आहे.

**राज्य महिला परिषद :-** दि. 15.16 मार्च 2025 ला नागपूरमध्ये घेण्यात आलेल्या राज्य महिला परिषदेत महिला गट चर्चा घेण्यात आली होती. प्रत्येक गटाला एक विषय देण्यात आला, महिलांनी अतिशय उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला, यात सहभाग घेतला आणि प्रत्येक महिला सदस्यांनी मनमोकळ्या मनाने आपली बाजू मांडली आणि मते व्यक्त केली, त्या चर्चेचे निवडक मुद्दे येथे विषद करत आहे.

**1) स्त्रिया, अंधश्रद्धा व दूरदर्शन मालिका :-** जादू, टोना, भूत, प्रेत ज्योतिष अशा विषयावर दूरदर्शन वरील मालिका स्त्रिया बघतात आणि त्या अंधश्रद्धेवर आधारित असतात. त्याचे सादरीकरण, वास्तविक असल्यासारखेच वाटते आणि स्त्रिया नकळत त्यावर विश्वास ठेवतात. मालिकेमध्ये स्त्रिला नटवून, खूप सारे अलंकार, दागदागिनेंनी मढवले जाते, स्त्रियांना तसे राहण्याची भुरळ पाडली जाते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या प्रथा, परंपरा, कर्मकाड व्रतवैकल्ये यावर मालिका बनविल्या जातात आणि स्त्रिया त्यात अडकत जातात आणि त्याचे अंधाधुंदीकरण सुरू होते.

**उपाय :-** मालिकांचा TRP न वाढवता, दूरदर्शनवर जास्त वेळ न घालवता वेळेचा सदुपयोग कसा व कुठे करायचा ते महिलांना समजावुन सांगणे, स्त्रीने बुद्धीप्रामाण्यवादी राहुन काय खरे काय खोटे हे तपासून पहाणे ही काळाची गरज आहे.

**2) स्त्रियांचे आरोग्य विषयक समस्या व अंधश्रद्धा :-** परंपरा, रुढी यांचा पगडा स्त्रियांवर अधिक आहे, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची मानसिकता त्याला खतपणी घालत असते. सतत उपास तापास करणे त्यामुळे होणारे कुपोषण, आजारी असेल तर डॉक्टरकडे न जाता घरगुती उपाय करत राहणे आणि तब्येत बरी झाली नाही की कोणीतरी मला करणी केली असेल म्हणून अंधश्रद्धेकडे जास्त लक्ष दिले जाते. लैंगिक समस्या, लैंगिक आजार लपवणे, अपत्य न झाल्यामुळे, अंगारे, धुपारे, बाबाच्या आहारी जावून अंधश्रद्धेला बळी पडते.



**उपाय :-** ती शारीरिकदृष्ट्या सक्षम, सुदृढ असणे फार महत्वाचे आहे, दुरदृष्टिकोन असावा, कार्यकारणभाव तपासावा, मुलगा, मुलगीमध्ये भेद न करता मुलीला कुटुंबात मानसन्मान मिळावा. निच्या विचारांना तिच्या कर्तृत्वाला योग्य तो सन्मान समाजात मिळावा. तिला मानसिक आधार द्यावा.

**3) स्त्रिया अंधश्रद्धेच्या बळी आणि वाहक :-** नवरात्रीचे उपास, वैभवलक्ष्मी, वट पौर्णिमा, हरतालिका, सोवळे पाळणे, नवस करणे, नवसाळा बळी देणे या सर्व परंपरागत, धार्मिक सांस्कृतिक संस्कारातून व्रतवैकल्य, कर्मकांड मोठ्या कसोशिने पाळणे म्हणजे आपली महान संस्कृती जपणे, हे केवळ स्त्रियांचेच कर्तव्य मानले जाते. त्यातला कार्यकारणभाव तपासल्या जात नाही व हे का, कश्यासाठी असे प्रश्न विचारले जात नाहीत. वैज्ञानिक दृष्टीकोण समजून घेण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. मागच्या पिढीतून पुढच्या पिढी पर्यंत संस्कार, श्रद्धा (अंधश्रद्धा) पोहचवायचे काम आपलेच आहे असे स्त्रिया समजतात आणि निमूटपणे आपल्या मुलांना संस्काराच्या मार्गाने गळी उतरवतात. हीच मुले, मुली स्वतःला कितीही आधुनिक समजत असले तरीही त्यांच्या मनात या अंधश्रद्धा खोलवर रुजल्या असतात, जीन्ससारखे पोशाख घालून वटवृक्षाला हाच नवरा सात जन्म मिळावा म्हणून फेऱ्या मारतात, वस्तूस्थिती ही आहे की आज लग्न झाल्याबरोबर सहा महिने एक वर्षात घटस्फोटाचे होत आहेत.

**उपाय :-** कार्यकारणभाव तपासणे, वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेणे, सुरक्षिततेसाठी नवरा, मुलगा काय करतात, याचा विचार करावा. यासाठी प्रबोधनाची गरज आहे.

**4) आधुनिक स्त्री आणि अंधश्रद्धा :-** स्त्रिया आज 2025 मध्ये आधुनिक झाली आहे. परंतु खालील गोष्टी त्या अजूनही सोडावयास तयार नाहीत. मासीक पाळीच्या काळात एकटे राहणे, वटपुजा करणे, हाताला पायाला काळा दोरा बांधणे, दिवा विझला की घाबरणे, रात्री कचरा बाहेर न टाकणे, नदी आली की पैसे टाकणे, शस्त्रक्रिया मुहूर्त पाहुन करणे, अमावस्या-अंधार, पौर्णिमा-उजेड पाहून चांगले कार्य करणे. सर्व स्त्रियांवर लहानपनापासून झालेले संस्कार, देवाधर्माची भिती, प्रत्येक धर्मात हेच सांगितले जाते, अशी शिकवण असल्याने स्त्रिया लहानपणापासून अंधश्रद्धा जपत असतात आणि पसरवत असतात. अर्थाजन करणाऱ्या स्त्रियासुद्धा आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत, आपल्याला मेंदु आणि मन ही आहे. आपल्यामध्ये अनेक क्षमता आणि कौशल्ये आहेत याची जाणीव त्यांना नसते. आज अर्थाजन करणाऱ्या स्त्रिया नवरात्रीला व्रतानिमित्त रोज वेगवेगळ्या रंगाच्या साड्या परिधान करून ऑफिस, शाळा, कॉलेज ला हजर राहतात. पायात चप्पल घालत नाहीत, पायाला काळे दोरे बांधतात.

**उपाय :-** स्त्रियांमधील कौशल्ये आणि अनेक कला असतात. त्यांचा योग्य उपयोग कसा करता येईल यावर भर देणे, तिला याची जाणीव करून देणे. वैज्ञानिक दृष्टिकोन समजवून सांगणे, स्त्रियांमधील सामाजिक बदल विवेकी विचारांचे परीवर्तन झाल्याशिवाय तिची यातुन सुटका होणार नाही.

**5) आध्यात्मिक बुवाबाजी आणि स्त्रियांचा वाढता सहभाग :-** स्त्रिया त्यांच्यावर लादल्या गेलेल्या परिस्थितीमुळे, गुदमरून टाकणाऱ्या वातावरणामुळे अंधश्रद्धाना जास्त बळी पडतात. लहानपणापासून झालेले संस्कार त्या पुढच्या पिढीकडे पोहचवतात. अंधश्रद्धेच्या बळी आणि वाहकही त्याच स्त्रिया असतात. अंधश्रद्धा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे समाजात वावरत असतात. स्त्रिया कोणत्याकोणत्या कारणाने दु:खी असतात, कुणाला पैश्याची चणचण असते, तर कुणाला मुलबाळ होत नसते, नौकरी नसते. अश्यावेळी त्या बुवाबाबाच्या संपर्कात आल्यास आपोआप त्या बाबाच्या भूलथापांना बळी पडतात. तत्वज्ञानाची वा आध्यात्मिक भाषा व्यक्तिमत्व व संमोहन यांचा वापर करुन हे बाबा स्त्रियांचा गैरफायदा घेतात आणि त्यांचा आर्थिक, मानसिक, शारीरिक पिळवणूक करतात. बाबा कोणताही चमत्कार करत नाहीत. तरीही अशांच्या मागे स्त्रिसमुदाय लागलेले असतात. प्रार्थना प्रवचने, गुरुच्या विचारांचा प्रसार, पारायणे यामध्ये स्त्रिया फार मोठ्या प्रमाणात बळी पडतात. गटचर्चेच्या माध्यमातून असा निष्कर्ष काढण्यात आला की समाजात असलेली अंधश्रद्धा केवळ शिक्षणाच्या अभावामुळे नाही तर मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभावामुळे ती अधिक गंभीर होत चालली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन प्रत्येक शाळांमधून, कॉलेजमधून रुजविणे आवश्यक वाटते. महिलांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी विवेकी विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार व प्रसार, स्त्रीशिक्षण आणि भावनिक सशक्तीकरणच्या माध्यमातून विवेकी समाज आणि महिला जागृतीकरण गरजेचे आहे. ■ ■



देवयानी भगत
मो. 9423064398

“ संकटांचा सामना आत्मविश्वासाने करा, यश आपलेच ! ”



# आंबेडकरी समाजकार्य

*समाजकार्याच्या क्षेत्रातील विविध संघटनांच्या वतीने ऑगस्ट-2025 मध्ये ‘समाजकार्य सप्ताह/पंधरवडा/महिना’ साजरा केला जात आहे. त्या औचित्याने हा लेख...!*

समाजकार्य ही सामाजिक शास्त्रातील एक महत्वाची विद्याशाखा आहे. पूर्वी, धर्म आणि त्यातील सेवाभाव या विचारधारेतून जन्माला आलेली व पुढे कालपरत्वे विकसीत होत गेलेली ही ज्ञानशाखा पाश्चात्य देशातून व्यावसायिक सेवेचे रूप धारण करीत भारतात थडकली, स्थिरावली व विकसीत सुद्धा झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात समाजकार्य शिक्षणाची महाविद्यालये सुरु होऊ लागली. सरकारी अनुदान मिळू लागले. महाविद्यालयांची संख्या सुद्धा वाढली. या महाविद्यालयातून समाजकार्याचे पदविका, पदवी, पदव्युत्तर शिक्षणाची सोय झाली. समाजकार्य ही शास्त्रीय ज्ञान, मानवी कौशल्य व मानवतावाद यावर आधारित असलेली व्यायसायिक सेवा आहे. जिचा मुख्य उद्देश व्यक्ती, समूह व समुदायाला अशाप्रकारे मदत करणे आहे, जेणेकरून ती व्यक्ती, समूह व समुदाय आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या समस्येचे निराकरण स्वतः करतील.

धर्मार्थ सेवाभावातून होत असलेले कार्य व्यावसायिक म्हणून होऊ लागले. ते विज्ञानवादी झाले. लोकशाही, कल्याणकारी सेवाकार्य, सुधारात्मक-उपचारात्मक-पुर्नवसनात्मक कार्य असे त्यास स्वरूप प्राप्त झाले खरे. मात्र नवउदारमतवाद, जागतिकिकरण, खाजगीकरण या आवाहनांना समर्थपणे तोंड देऊन समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याचे कार्यात अपयश आले हे मान्य केले पाहिजे. समाज परिवर्तनाच्या विचारधारांचे सैद्धांतिक अधिष्ठान प्राप्त झालेले समाजकार्य गांधी, मार्क्स आणि इतर अनेक विचारवंतांचा पुरस्कार करू लागले खरे पण त्यात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सोयीस्करपणे टाळू लागले. आंबेडकर वगळून समाजकार्य कसे होईल? दुसरा महत्वाचा व गंभीर प्रश्न असा की, आरक्षणाने लाभान्वित झालेल्या समाजकार्याच्या क्षेत्रातील लोकांच्या भूमिका व वर्तन कसे आहे. समाजकार्याच्या क्षेत्रातील सर्वच मंडळी समाज आणि समस्यांच्या वर्णनात अडकली आणि अपेक्षित वर्तन बिघडले. यास आरक्षणाने लाभान्वित झालेले लोकही अपवाद नाहीत. उलटपक्षी ते जास्त जबाबदार आहेत.

डॉ. बाबासाहेबांनी मानवमुक्तीचा जाहीरनामा दिला. हा जाहीरनामा म्हणजेच ‘भारताचे संविधान’ होय. हे संविधान भारताच्या लोकांनी स्वतःप्रत अर्पण केले असले तरी त्यातील विचार वैश्विक आहे. विश्वातील अखिल मानवासह झाडे, पशु, पक्षी, पर्यावरण, सजीव सृष्टीचा समग्र कल्याणकारी विचार संविधानात आहे. माणसाच्या जन्मापासून सर्व अवस्था आणि टप्प्यांवर संविधान सोबत करतो. व्यावसायिक समाज-कार्यातील व्यक्तीसहाय्य कार्य, गटकार्य, समुदाय संघटन, समाज कल्याण प्रशासन, सामाजिक संशोधन व सामाजिक क्रिया त्यात प्रभावीपणे कोरलेले आहे. ग्रामीण-आदिवासी-शहरी समुदायांचा विकास, कामगार कल्याण, महिला व बाल विकास, कुटुंब कल्याण,



अपराध्यांचे सुधार कार्य, आरोग्य विकास, युवक कल्याण, वृद्धांचे कल्याण, दिव्यांग कल्याण, नशाबंदी, शिक्षण, रोजगार, पर्यावरण शिक्षण, विज्ञानवादी दृष्टीकोन, दुर्बल घटकांचे कल्याण, आपत्ती व्यवस्थापन, सहकार इत्यादी क्षेत्रात कल्याणकारी कार्य करण्याचे दालन संविधान देतो. शाश्वत विकास ही संकल्पना संविधानाने दिली आहे. त्यासाठी संरक्षण-आरक्षण-विकासाची संधी संविधानाने दिली आहे. जात, धर्म, वंश, पंथ, लिंग, भाषा, वर्ण, रंग, जन्माचे ठिकाण, प्रदेश इत्यादी प्रकारच्या सर्व भिंती ज्या माणसाला माणसापासून दूर करतात त्या सर्व भिंतीना जमीनदोस्त करुन समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याचे काम समाजकार्यकर्त्यांनी करणे अपेक्षित होते. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय ही जीवनमूल्ये रुजविण्याचे काम समाजकार्यकर्त्यांनी करणे अपेक्षित होते. त्यासाठी व्यावसायिक समाजकार्यातील पद्धती व क्षेत्र हे माध्यम किंवा साधन आहे. ते साध्य नाही. मात्र साधन हेच साध्य समजून त्यांच्या वर्णनात व उदात्तीकरणात व्यावसायिक समाजकार्यकर्ते अडकले. संविधानाची अपेक्षापूर्ती करण्यात व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांनी स्वःताला सोयीस्कर दूर ठेवले. वरवरच्या पोकळ गोष्टी करुन आतल्या मर्मबिंदुना टाळले. परिणामतः बाबासाहेबांच्याच शब्दात ‘काम के वास्ते’ नव्हे तर ‘नाम के वास्ते’ लोक या क्षेत्रात येऊ लागले.

एकट्या महाराष्ट्रात जवळपास 66 महाविद्यालये आहेत. सरकारी अनुदानातून 50 महाविद्यालये चालतात. सामाजिक न्याय विभाग अनुदान देतो. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन देतो. अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी ठेवलेल्या बजेटमधून अनुदान दिले जाते. वास्तविक पाहता हे चुकीचेच आहे. या महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी फक्त अनुसूचित जातीचे नाहीत. विद्यार्थी फक्त अनुसूचित जातीचे नाहीत. मग हे धोरणाविरुद्ध आहे. उशिरा का होईना, आता फेब्रुवारी 2024 मध्ये ही महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला. संविधानाच्या अनुच्छेद 46 मधून जन्माला आलेला सामाजिक न्याय विभाग हा बाबासाहेबांच्या अविश्रांत कष्टांची फलनिष्पती आहे. याच सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालयांची सामाजिक व संविधानाप्रती बांधिलकी काय? संविधान काळजावर कोरून किती प्राध्यापक काम करीत आहेत? संविधानाचे लाभार्थी संविधानाशी प्रामाणिक आहेत काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो...! भारतीय संविधान चिरायू हो...! या घोषणाबाजीत फक्त रममाण झालेल्या संविधानाच्या सर्व लाभार्थ्यांना संविधान म्हणजे काय? हेच माहित नाही. संविधान म्हणजे माणसाने माणसाला भेटणे. माणसाने माणसाशी बोलणे. माणसाने माणसाचे ऐकणे. अशी संस्कृती निर्माण होणे अपेक्षित आहे. समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी संविधानाच्या जिवंत प्रती वाटण्याचे काम करायचे आहे. यालाच आंबेडकरी समाजकार्य असे म्हटले जाईल. संविधान घृणा वाटत नाही. संविधान द्वेष वाटत नाही. संविधान कोणत्याही प्रकारची विषमता वाटत नाही. संविधान प्रत्येकाच्या हाती बुद्ध देतो. हे बुद्ध पोहोचविण्याचे काम आंबेडकरी समाजकार्यात झाले पाहिजे. आंबेडकरी समाजकार्य हे फक्त अनुसूचित जातीच्या लोकांनी किंवा बौद्धानीच केले पाहिजे असे म्हणणे संविधानविरोधी होईल. संविधानाचा लाभ घेतलेल्या किंवा घेत असलेल्या प्रत्येकाचे हे नैतिक कर्तव्य आहे. या देशाचा प्रत्येक नागरिक संविधानाचा लाभार्थी आहे, हे कुणीही विसरता कामा नये. जो विसरला, तो बेईमान. व्यावसायिक समाजकार्यातील पद्धती व तंत्रे यांचा वापर करीत संविधान डोक्यात ठेऊन समाजातील सर्व घटकांच्या विशेषतः दलित, शोषित, वंचित, पीडित, मागासलेल्या समाजाच्या नैतिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय सुद्धा, अशाप्रकारच्या शाश्वत विकासासाठी बांधिलकीने कार्य करणे म्हणजेच आंबेडकरी समाजकार्य होय.

भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्ष झालीत. संविधान स्वीकृत होऊन 75 वर्ष झालीत. संविधान अंमलात येऊन 75 वर्ष झालीत. मग त्यातील अमृत कुठे गेले? राशन कार्ड नाही, जन्माचा दाखला नाही, जातीचा दाखला नाही, मतदार म्हणून नोंदणी नाही, घर नाही, जमिनीचे पट्टे नाही, रस्ता नाही, वीज नाही, पाणी नाही, शाळा नाही... ही यादी मोठी होत असतांना आम्ही भारताचे लोक... अशी संविधान प्रास्ताविका वाचून किती दिवस आत्मसुख मानणार? की त्याहीपुढे आमच्या कर्तव्याचे विश्व आहे? होय, आहे. आम्हाला समाजकार्य शिक्षणाने दिलेले वाघिणीचे दूध प्राशन करुन सर्व संविधानिक मूल्ये घराघरात आणि मनामनात पोहोचवावे लागेल. म्हणजे ती व्यक्ती, समूह व समुदाय संविधानिक मार्गाने-विचाराने आत्मनिर्भर होऊन स्वतःच्या समस्यांचे निराकरण स्वतः करतील. इतरांनाही संविधानाचा हात देतील. हे संवाहन वाढत जाईल. त्यातून मानवमुक्तीची एक मोठी चळवळ उभी होऊन संविधान संस्कृतीचा सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य असलेला समताधिष्ठित भारत राष्ट्र निर्माणाचा आम्ही दि. 26 नोव्हेंबर 1949 रोजी केलेला संकल्प पूर्णत्वास येईल. हे संवाहन जलदगतीने घडो, हीच सदिच्छा! ■ ■

डॉ. महेंद्रकुमार मु. मेश्राम
मो. 9975665862

# साहित्यातील आधुनिक संत चरित्रकार
## रामकृष्णदादा बेलूरकर



*आद्यग्रामगीताचार्य पूज्य श्री. रामकृष्णदादा बेलूरकर. ग्रामगीतेच्या प्रचार - प्रसारासाठी आपले उभे आयुष्य वेचणाऱ्या संत चरित्रकाराला विनम्र अभिवादन.*

सेवांची जाण! जेणे मार्गी लागती जन! जन तितुका जनार्दन! - राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या या ओवीप्रमाणे, आयुष्यभर साहित्यसेवा, संतचरित्र लेखन आणि समाजजागृतीचे कार्य करणारे पूज्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर हे विदर्भातील संत साहित्य विश्वातील एक मानबिंदू होते.

सन 1930 या वर्षातील श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी, तिवसा तालुक्यातील वरखेड येथे दादांचा जन्म झाला. तरुण वयात शिक्षण घेत असतानाच वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या सहवासाने त्यांना संत साहित्य लेखनाची प्रेरणा मिळाली. वरखेड मुक्कामात महाराजांची सेवा करताना त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ऐकलेले वाक्य ‘रामकृष्णा! यह शरीर की कुस्ती छोड दे, अब दिमाग की कुस्ती लड़ते जा!’ - हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय ठरले. त्यांच्या साहित्य लेखनाची सुरुवात सन 1963-64 साली ‘राष्ट्रसंताचे गुरुदेव - परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराज जीवनचरित्र’ या ग्रंथाने झाली.

त्यानंतर ‘चार महर्षी’ या ग्रंथात त्यांनी विश्वयोगी स्वामी सीताराम दासजी महाराज, माताजी गौरीशंकर महाराज, संत दामोदरदास महाराज आणि राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या चरित्रांची मांडणी केली.

या ग्रंथाला स्वतः राष्ट्रसंतांनी प्रस्तावना दिली. यानंतर त्यांनी पन्नास-साठ पुस्तके लिहिली, ज्यामध्ये ‘युगप्रवर्तक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज’, ‘ग्रामगीता-अ विष्कार’, ‘ग्रामगीता-पसायदान’, ‘ग्रामगीता-अर्पणपत्रिका’ यांचा विशेष उल्लेख होतो.

ग्रामगीतेवर भारतभर प्रवचने देत असताना, 1953 साली वरखेड येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना ‘ग्रामगीताचार्य’ ही पदवी देण्यात आली. पूर्वी रामायण, महाभारत, भगवत गीता जगभर प्रसिद्ध होती, पण ग्रामगीतेचा देशव्यापी प्रचार-प्रसार आयुष्यभर करणारे ते पहिले प्रचारक होते. त्यामुळे त्यांना ‘आद्यग्रामगीताचार्य’ म्हणून ओळख मिळाली. दादांनी केवळ साहित्यच नाही तर समाजात परिवर्तन घडविणारे अनेक उपक्रम राबवले, जसे की व्यसनमुक्ती, दारूबंदी, गुटखाबंदी, हुंडाबळी निर्मूलन, अनिष्ट रुढी निवारण, युवक संघटन, महिलांची उन्नती, पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड, राष्ट्रीय एकात्मता, सामुदायिक प्रार्थना व विवाह असे उपक्रम त्यांनी राबविले.

श्रीक्षेत्र वरखेड, टाकरखेडा, गुरूकुंज आश्रम, रामटेक आश्रम, माधान, दाभा पहूर, रामनगर खापा आश्रम अशा संस्थांच्या विकासात त्यांनी मोठा वाटा उचलला. परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराज संस्थांचे सचिव असताना ‘राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सांस्कृतिक भवन’ उभारले आणि शाश्वत अन्नदान योजना सुरू केली. भव्य पंचमहोत्सव यशस्वीरित्या आयोजित केला. आज त्यांचे वाङ्मय कार्य जगभर पोहोचले आहे. संत साहित्य क्षेत्रातील मान्यवर त्यांना ‘विदर्भाचे दासगणू’ म्हणून गौरवतात. त्यांच्या ग्रंथात ग्रामगीतेची परिवर्तनबीजे आजही पेरलेली आहेत. त्यांनी संत साहित्याचा जो वारसा जोपासला तो आजही नवीन पिढीला दिशादर्शक ठरला आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी हा त्यांचा जन्मदिन. आज ते आपल्यात नसले तरी त्यांच्या प्रवचनांची गोडी, साहित्यसेवेची परंपरा आणि ग्रामगीतेवरील निष्ठा समाजाला सतत प्रेरणा देत राहील. संत चरित्रकार आद्यग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर यांच्या चरणी विनम्र अभिवादन! ■ ■



रवींद्र दांडगे
मो. 94045 45238

# भन्ते आनंद वर दोषारोपण

**प्रथम संगोती मध्ये सुत्त पिटकाची निर्मिती भन्ते आनंद मार्फत करण्यात आली. भिक्खू आनंद हे भगवंताचे एक प्रकारे खाजगी सचिव होते ते भगवंता सोबत पंचवीस वर्षापासून सोबत होते. त्यांनी भगवंता सोबत राहून प्रत्येक धम्म उपदेशाचे श्रवण व मनन केले होते.**




भगवंतानी कथन केलेले प्रत्येक सुत्त मुखोगत होते. त्यामुळे जेव्हा प्रथम संगीती झाली त्यावेळेस भन्ते आनंद अर्हत प्राप्त झाले नव्हते. तरी पण त्यांचेसाठी एक जागा रिक्त ठेवण्यात आली होती. प्रथम संगीतीमध्ये 499 अर्हत प्राप्त भिक्खूची निवड महाथेर महाकाश्यप यांनी केली होती व भन्ते आनंदला जेव्हा अर्हतपद प्राप्त झाले तेव्हा ते प्रथम संगीतीमध्ये सामील झाले असे एकूण 500 अर्हत भिक्खू प्रथम संगीती मध्ये उपस्थित होते. प्रथम संगीती मध्ये प्रथम बुद्धाच्या सुत्ताचे पाठण भन्ते आनंद द्वारा करण्यात आले त्यानंतर सर्व भिक्खूनी अनुमोदन देऊन त्या सुत्ताला प्रमाणित करण्यात आले आहे. जेव्हा प्रथम संगीतीची कार्यवाही सुरु होती त्या दरम्यान भन्ते आनंद वर दोषारोपन लावण्यात आले व भन्ते आनंदकडून त्याचे स्पष्टीकरण मागण्यात आले.

**दोषारोपन 1 :**
भगवंतानी महापरिनिर्वाणाच्या पूर्वी माझ्या पश्चात लहान लहान भिक्खू नियमांना हटवू शकता असे आनंदाला सांगितले होते तर महाकश्यप यांनी भन्ते आनंदला विचारले की कोणते लहान लहान नियम हटवायचे सांगितले. त्यावर भिक्खू आनंद म्हणाले भन्ते मला आठवण न राहल्याने भगवंताला विचारू शकलो नाही. आनंद भन्तेनी स्पष्टपणे भगवंताला कोणते छोटे छोटे नियम हटवायचे न विचारल्याचे दोषारोपण ठेवले होते.

**दोषारोपन 2 :**
भगवंताची वर्षासाठी आपण पायाच्या आंगठ्यात घेऊन शिवत होता काय हे खर आहे. त्यावर भन्ते आनंदजी स्पष्टीकरण दिले की भन्ते भगवंताचा अपमान करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता वर्षासाठी लवकर व चांगली शिवण्याच्या उद्देशाने मी तसे केले.

**दोषारोपन 3 :**
आनंद तुम्ही भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले तेव्हा त्याच्या शरीराची वंदना करण्यास प्रथम स्त्रियांना परवानगी दिली व या स्त्रियांच्या रडण्याने भगवान बुद्धाचे शरीर पूर्ण ओले झाले तुम्ही असे का केले ? त्यावर आनंद भन्ते स्पष्टीकरण देतात भन्ते भगवंताचे दर्शन करण्यास लाखो श्रद्धालू आले होते. त्यांना एक एक करून भगवंताचे दर्शन करण्यास जाऊ दिले असते तर खूप वेळ लागला असता म्हणून वेळ वाचविण्या- करिता मी स्त्रियांना प्रथम दर्शनाची अनुमती दिली व त्यांच्या अनावरू अश्रू मुळे भगवंताचे शरीर भिजले.

राजेंद्र मडके
मो. 9423681140

**दोषारोपन 4 :**
भन्ते आनंद आपणावर हा आरोप आहे की, आपण बहुजन हिताय बहुजन सुखायच्या हितासाठी, प्राणो मानाच्या हितासाठी भगवंताला काही काळासाठी महापरिनिर्वाण पुढे ढकलण्यासाठी का आग्रह केला नाही. त्यावर भन्ते आनंद ने स्पष्टीकरण दिले की, भन्ते त्यावेळेस मार ने माझ्या मनाला भ्रमीत केले होते. भगवंताची आज्ञा पालना शिवाय मला काही सुचत नव्हते. तसेच भगवंताचे महापरिनिर्वाण पूर्व नियोजीत होते.

**दोषारोपन 5 :**
आनंद आपण स्त्रियांना धर्मामध्ये प्रवज्या देण्याकरिता भगवंताचे मन वळविले, त्यावर भन्ते आनंद ने उत्तर दिले भन्ते महाप्रजापती जेव्हा धम्मात प्रवजित होण्यास आल्या होत्या, त्या भगवान बुद्धाची मावशी होती. त्यांनी भगवान बुद्धाची आई महामाया वारल्यावर त्यांचे लालन पालन केले.

त्यांना दुध पाजले, आईची ममता दिली अशी महान वि जर धम्मामध्ये प्रवजित होऊन निब्बान प्राप्त करण्यास इच्छा व्यक्त करीत असेल तर अशा स्त्रियांना धम्मात स्थान देण्याविषयी मी भगवंताचे मन वळविले, कारण भगवान बुद्धाच्या धम्मात पुरुष व स्त्री समान आहेत. हे माझ्या दृष्टीने दुष्कृत नाही.

वरीलप्रमाणे भन्ते आनंद वर लावण्यात आलेल्या दोषाचे स्पष्टीकरण दिल्यावर पूर्ण भिक्खू संघ संतुष्ट झाला व भन्ते आनंदला क्षमा करण्यात आली. ■ ■

# सावंतवाडीचे बापूसाहेब
## उत्कृष्ट न्यायाधीश

**गरिबांसाठी धावून जाणारे मानवतेचे उपासक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौरविलेले बापूसाहेब महाराज उर्फ पंचमखेमराज यांची आज, 20 ऑगस्ट रोजी 128वी जयंती त्यानिमित्ताने...**

स्वातंत्र्यपूर्व काळात मोजक्या राजपुरुषात परम आदरणीय बापूसाहेब उर्फ पंचमखेमराज यांचा क्रमांक खूपच वरचा आहे. तत्कालीन बडोदा नरेश महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे), कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्याशी तुलना करता, बापूसाहेब महाराजांचा कालखंड हा अत्यल्प. 12 वर्षे 8 महिने आणि 5 दिवसांचा असा एक तपाचा त्यांचा राज्यकारभार होता.

या एका तपात आपल्या साध्या, सरळ राहणीने आणि मृदु वाणीने त्यांनी प्रजाजनांची मने जिंकली. सिंधुदुर्गच्या कुशीत वसलेल्या निसर्गरम्य, वृक्षलतांनी बहरलेल्या सावंतवाडीसारख्या चिमुकल्या संस्थानाचे नाव त्यांनी जगाच्या नकाशावर कोरले.

अशा या राजपुरुषाचा जन्म 20 ऑगस्ट 1897 रोजी झाला. बापूसाहेबांचे वडील श्रीराम सावंत (रावसाहेब) यांना राजपद लाभले. युवराजांच्या पायगुणाने अल्पकाळात राजपद मिळाल्यामुळे त्यांच्या मनात बापूसाहेब महाराजांबद्दल विशेष कौतुकाची भावना होती. दुर्दैवाने मातृछत्र बालवयातच हरपले. मातोश्री राणी जानकीसाहेबांनी 1902 मध्ये जगाचा निरोप घेतला. मुलगा अतीलाडाने वा कोडकौतुकाने बिघडू नये म्हणून रावसाहेब आणि तत्कालीन पोलिटिकल एजंट यांनी बाळाला 24 ऑक्टोबर 1903 पासून गर्व्हनेक्स मिस मॉक्सन यांच्या हवाली केले.

मिस मॉक्सन यांनी बाळाचे संगोपन व शिक्षणाची जबाबदारी अत्यंत समर्थपणे पेलली. खऱ्या अर्थाने त्या बापूसाहेबांच्या मातोश्रीच बनल्या होत्या. बापूसाहेबांच्या जीवनात मिस मॉक्सन यांचे मातेचे स्थान अखेरपर्यंत कायम राहिले. मॉक्सन बाईनीही एखाद्या राजपुरुषाला साजेसे वळण व शिक्षण त्यांना दिले.

प्राथमिक शिक्षणाबरोबरच मैदानी खेळ, शिकार या शौर्य प्रकारांबरोबरच कला, साहित्य, संगीत आणि धर्मशास्त्र यांची गोडी जाणीवपूर्वक महाराजांच्या मनात रुजविली. इंग्रजी व मराठी भाषेत तरबेज केले. पुणे खडकी येथे मिस मॉक्सन बाईच्या सान्निध्यातील बापूसाहेबांचा काळ अत्यंत संस्कारक्षम असा होता. इंग्लडमध्ये एक वर्ष मि. ॲलन आणि पुढे रेव्हरंड इ. एल. होम्स हे महाराजांचे गार्डियन होते.

मॅलव्हर्न कॉलेजमध्ये पदवीधर होण्याच्या दृष्टीने महाराजांची शैक्षणिक वाटचाल सुरू असतानाच पहिल्या महायुद्धाचा वणवा हळूहळू सर्वत्र पसरायला सुरुवात झाली होती. त्यामुळे महाराजांना लष्करी शिक्षणाचे वेध लागले.



प्रवेश न मिळाल्याने मॅलव्हर्न कॉलेजमधील चार वर्ष घालवून 1916 साली मायदेशी येण्याचा त्यांनी विचार केला. दरम्यान युद्धाच्या वाढत्या वणव्यामुळे लष्करी भरतीचे नियम शिथिल झाले. याचा फायदा उठवत जानेवारी 1917 मध्ये ऑफिसर्स कॅडेट बटालियन ट्रेनिंग स्कूल (केंब्रिज) मध्ये ते दाखल झाले. प्राथमिक लष्करी शिक्षण पूर्ण करून पुढे ते सेकंड लेफ्टनंट पदावर 116 मराठा लाईट इन्फ्ट्रीमध्ये कार्यरत झाले आणि 27 ऑगस्ट 1917 रोजी मेसापोटेमियात युद्धावर दाखल होण्याकरिता इंग्लडमधून रवाना झाले.

29 ऑक्टोबर 1924 रोजी बापूसाहेब महाराजांचा राज्यारोहण सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. 86 वर्षांनंतर सावंतवाडी संस्थानास पूर्ण अधिकार प्राप्त असलेला राजा प्राप्त झाल्याने प्रजा खूपच आनंदित झाली. लेस्ली विल्सन या ब्रिटिश अधिकाऱ्याने संपूर्ण अधिकाराच्या खलित्याचे वाचन करताच महाराजांनी उठून त्यांचा विनम्रपणे स्वीकार करून आपले मनोगत सर्वासमक्ष मांडले. महाराज म्हणाले, ‘प्रजेची भरभराट हेच आमचे सामर्थ्य; त्यांचे सुख समाधान हीच आमची शाश्वती आणि त्यांचा दुवा हेच आमचे मोठे बक्षीस होय.’ एका सत्कार समारंभप्रसंगी महाराज म्हणाले, ‘‘हल्लीच्या विद्यार्थ्यांमधील मुख्य दोष म्हणजे त्यांना शिक्षकांविषयी आदर दिसत नाही.

श्रद्धावान लाभते ज्ञानम् म्हणजे श्रद्धा असणाऱ्या मनुष्यासच ज्ञान प्राप्त होत असते. या भगवंताच्या वचनाप्रमाणे वागलात तर तुमचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.’’ बापूसाहेब गादीवर येताच त्यांनी जाहीरनाम्यात नमूद केले की, ‘‘जाती जातीतील व धर्मांधर्मातील प्रश्नांचा निकाल करताना दोन्ही पक्षांनी समतोलपणा, सहानुभूती व सौजन्य या गुणांचा अवलंब करून परस्परांशी बंधुत्वाच्या नात्याने वागावे. रयतेचे सुख-समाधान तेच आमचेही सुखसमाधान. इतकेच नव्हे तर आमच्या कर्तव्याची खरी फलश्रुती त्यातच आहे असे आम्ही मानतो.’’ अशी मानवतावादी विचारधारा समोर ठेवून महाराजांनी ‘सर्व समाज विकासाचा मूळ पाया शिक्षण होय’ अशीही खूणगाठ मनी बांधली होती.

पारंपारिक शिक्षक पद्धतीबरोबरच व्यावसायिक व शेतीविषयक शिक्षणाची जोड देऊन शिक्षण अधिकाधिक लोकाभिमुख करताना महिलांसाठी मोफत शिक्षण, प्रौढ शिक्षण अभियान, फिरत्या ग्रंथालयाची सोय अशा विविधांगी उपक्रमांनी शिक्षण खऱ्या अर्थाने परिपूर्ण करण्याचा प्रयत्न संस्थानाच्या काळात विशेष जाणिवेने केला होता.

शेरा जमिनीविषयक त्यांनी केलेले नियम, महसुली पद्धती इ. बाबतचे संस्थानाचे धोरण हे भविष्यातील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कुळकायद्याची नांदीच ठरावी असे होते. अबकारी, मलेरिया, मागासवर्गीयांना उत्तेजन, नोकरीत आरक्षण, कर, जंगल, खनिज संपत्ती, आरोग्य, शिक्षण, न्याय, सहकारी इ. स्वतंत्र खाती स्थापून चालविलेला संस्थानचा कारभार हा पुष्कळसा लोकशाही पद्धतीचा होता. देवदासी प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी करून स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या संस्थानाने आपले पुरोगामित्व सिद्ध केले होते.

अशा या सर्वगुणसंपन्न राजाच्या कार्याने प्रभावित होऊन 1927 साली राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि 1935 साली संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बापूसाहेबांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली होती. पडवे गावचे जमीनदार वराडकर यांच्या खुनाच्या खटल्यातील आरोपी टिपगो महार यांचे वकील या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सावंतवाडीला आले होते. त्यावेळी बाबासाहेबांची बापूसाहेब महाराज यांच्याशी भेट झाली. महाराजांनी आरोपीच्या मृत्यूदंडाच्या शिक्षेचे रूपांतर जन्मठेपेत केले, तेव्हा डॉ. बाबासाहेबांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत ‘उत्कृष्ट न्यायाधीश’ म्हणून त्यांचा गुणगौरव केला. अशा या कर्मयोगी बापूसाहेब महाराजांचे पुण्यात 4 जुलै 1937 रोजी वयाच्या अवघ्या 40व्या वर्षी अपघाती निधन झाले. बापूसाहेबांच्या मृत्यूची बातमी ऐकून डॉ. बाबासाहेब हळहळले. त्यांना अतीव दुःख झाले. पत्र लिहिले. पत्रात डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘‘सावंतवाडीचे लोकप्रिय राजेसाहेब श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या अकाली मृत्यूची शोकजनक बातमी वाचल्यावर मला धक्काच बसला. राजेसाहेबांचे निधन ज्या परिस्थितीत झाले त्या दुर्दैवी परिस्थितीचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही. महाराजाच्या सहवासाचा दीर्घ काळापर्यंत लाभ घेण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले नाही. गरिबांचा कनवाळू आणि एक कर्तव्यनिष्ठ व प्रागतिक विचारांचा संस्थानिक हा त्यांचा लौकिकच माझ्या परिचयाचा होता. महाराजांच्या प्रत्यक्ष परिचय होऊन त्यांच्याशी संबंध येण्याची संधी फक्त एकदाच मला मिळाली. तथापि या अल्प परिचयातच महाराजांच्या अंगच्या काही ठळक सद्गुणांची जी छाप माझ्या मनावर पडली ती कधी पुसून जाण्याजोगी नाही.’’



मिलिंद मानकर
मो. 8080335096

बापूसाहेब आणि डॉ. बाबासाहेब यांची ज्या ठिकाणी भेट झाली होती. त्या ठिकाणी अलीकडेच भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. शिलालेखावर डॉ. बाबासाहेबांच्या पत्राचा मजकूर कोरण्यात आला. आता हे स्थळ ‘समता प्रेरणाभूमी’ म्हणून ओळखले जाते. समता प्रेरणाभूमी संवर्धन समितीच्या माध्यमातून या ठिकाणी विविध उपक्रम अव्याहतपणे राबविले जात आहेत. बापूसाहेबांनी आपल्या जीवनकाळात बहुआयामी सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष राबवून जनमानसात आदराचे आणि मानाचे स्थान निर्माण केले ते आजही अबाधित आहे. साठ्यांची जमीन मोजणी, खनिजांची पाहणी, काथ्यासारखे पारंपारिक कारखाने व त्यांचे जतन, सिटी सर्व्हे खाते, नळपाणी पुरवठा, नगरपालिकेची स्थापना, बँक अशी आणखी कितीतरी कामे बापूसाहेबांनी प्रत्यक्ष कृतीत आणली होती.

खेळाला चालना ते शिक्षणाच्या माध्यमातून हेही आणखीन एक वैशिष्ट्य. या संस्थानात त्यांनी निर्माण केले. त्यांच्या या सर्व सुधारणा स्वातंत्र्याची 78 वर्षे ओलांडली तरी आजही आपल्या देशातच नव्हे तर राज्यातही खऱ्या अर्थाने लागू होऊ शकल्या नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल.

पुण्यश्लोक, वंदनीय बापूसाहेब महाराज उर्फ पंचमखेमराज यांच्या 128 व्या जयंतीनिमित्त कोटी कोटी अभिवादन! ■ ■




## वैभवशाली बुद्ध विहार

रेल्वे कॉलनी, अजनी, नागपूर, विहारामध्ये नियमित वंदना, पौर्णिमा उत्सव, वर्षावास बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन जन जागृती करण्यात येत आहे. महिला उपासक संघ सहभागी असुन भंते विश्वजित नियमित मार्गदर्शन करीत आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
मो.8600924170



## शहीद विनोद पवार यांना श्रद्धांजली

**नागपूर :** 79 व्या स्वातंर्त्यदिनी बुलढाणा जिल्हा बी आर एस पी चे अध्यक्ष विनोद पवार यांनी पुनर्वसन गावात रस्ता बनवण्यात यावा या मागणीसाठी गावकऱ्यांच्या स्वाक्षरीसह शासन - प्रशासनाला निवेदन दिले होते.त्यातच महिनाभरात रस्ता तयार केला नाही तर आंदोलक 15 ऑगस्ट ला जलसमाधी घेतील असा इशारा ही देण्यात आला होता. तरीही प्रशासकीय यंत्रणेने दखल घेतली नाही. नदीपात्रात आंदोलक आंदोलन करीत असताना ही प्रशासनाने आंदोलकांना तिथून हटविले नाही आणि शेवटी विनोद पवार यांनी नदीला पूर आलेला असताना त्या प्रवाहात उडी मारुन जलसमाधी घेतली, त्यातच त्यांचा मृत्यू झाला.
या शहीद आंदोलकाला नागपूर जिल्हा बी आर एस पी द्वारा राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## बौद्ध समाजाच्या आर्थिक प्रगतीसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे काळाची गरज : डॉ. राजरत्न आंबेडकर

**नागपूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया नागपूर शाखेच्या वतीने सुरेश भट सभागृहात डॉ. भिमराव रामजी आंबेडकर मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी ली. बँकिंग नागपूर शाखेचा उद्घाटन समारंभ राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सभामंचवर भिक्कुनी भंते सुनिती, भंते सुमेधा, भंते निम्मलमेत्ता, राष्ट्रीय महासचिव राहुल शेंडे, राज्य अध्यक्ष रवींद्र गुरचळ, उपाध्यक्ष विजय वासे, सचिव विजय बनसोड, संघटक बुधाजी वाढविंदे, रविकांत जाधव, नीरज ताकसांडे, अशोक गडकरी, मध्य प्रदेश अध्यक्ष सदाशिव सोनटक्के, छत्तीसगडचे अध्यक्ष डॉ. एम. डी. वालदे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली असून उपस्थित मान्यवरांचे जिल्हा शाखा अध्यक्ष राजेश (बौद्ध) दहिवले यांनी स्वागत केले.
अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी प्रथम घटनेचे प्रास्ताविकेचे वाचन करून संबोधित करतांना म्हणाले



बौद्धांची स्वतंत्र आर्थिक व्यवस्था निर्माण व्हावी या करिता डॉ. भिमराव रामजी आंबेडकर मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी (बँकिंग) व्यवस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या सोसायटीचे येत्या दोन वर्षात बँकेत रूपांतर करण्यासाठी दहा लाख शेअर भागधारकांची आवश्यकता आहे. तसेच बँकेच्या व्यवस्थापनात बौद्धांची सत्ता कायम राहावी या करिता बौद्धांनी भागधारक बनावे असे आव्हान यावेळी उपस्थित जनसमुदायास व बुद्धविहार कमिटीच्या प्रतिनिधींना केले. नंतर डॉ. भिमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी ली. बँकिंग शाखेच्या बेझनबाग मैदानाजवळ असलेल्या नागपूर कार्यालयात जाऊन उद्घाटन केले.
कार्यक्रमाचा संचालन अजय पात्रे, प्रास्ताविक मीडिया समन्वयक डी. डी. गजभिये यांनी तर आभार प्रा. प्रीति तिरपुडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सचिव आकाश चवरे, नरेंद्र चहांदे, सरोज मेश्राम, अशोक रामटेके, प्रमोद श्रीरामे, अविनाश मेश्राम, अमन ठवरे, विलास झाडे, रंजीत राऊत, शांता डोंगरे, शीला रंगारी, किरण राऊत, अशोक सोनटक्के, रोशन राऊत, राजेश रामटेके, विनय वाघमारे, संजीवन वालदे, योगेंद्र भालाधरे, राजेश रंगारी, ज्योती बागडे, बेबी वानखेडे व समता सैनिक दलाचे प्रतिनिधी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महत्वाचे

## त्रिमूर्तीनगर येथील विपश्यना सेंटरचे महाबोधी विहार आंदोलनास दान

**संवाद मित्र शुद्धोधन बडवणे, नागपूर :** महाबोधी महाविहार मुख्य आंदोलनाचे संयोजक भन्ते विनयाचार्य यांनी आयोजित केलेले सुरेश भट सभागृह रेशीमबाग येथे जनसंवाद सभा



आयोजित केली होती. त्या सभेत त्रिमूर्तीनगर येथील विपश्यना सेंटर येथील कार्यकारी मंडळ व विहारातील इतर सदस्यांनी दान गोळा करून आपल्या अस्मितेचे जतन करण्याकरिता व महाबोधी महाविहार, बुद्धगया येथील विहार मुक्त व्हावे, या आंदोलना करीता एकूण जमा केलेले दान रुपये पंचवीस हजार चेकद्वारे प्रत्यक्ष भंते विनाचार्य यांना देण्यात आला. यावेळी विपश्यना सेंटर त्रिमूर्ती नगरचे मंडळाचे सचिव डी. एस. वाहने, बी. डी. बोरकर, अजबराव पाटील, जी. के. कांबळे व इतर सदस्य हजर होते.

## राजगृह फाउंडेशन तर्फे 40 आजी-माजी सैनिकांचा सत्कार

**नागपूर :** स्वातंत्र्यदिनी राजगृह फाउंडेशन तर्फे 40 आजी-माजी सैनिकांचा सत्कार देश सेवे शिवाय तरनोपाय नाही विलास दवणे



संयजक माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य. बेसा नागपूर संपूर्ण देशात 79 वा स्वतंत्र दिन मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. देशातील राजगगृह फाउंडेशन द्वारे 40 आजी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला, यावेळेस प्रस्तावना करताना राजगृह फाउंडेशनचे अध्यक्ष धनराज बडोले यांनी देश सेवा करणाऱ्या सैनिकांचा सत्कार करणे म्हणजे अप्रत्यक्षरीत्या आपल्यातही देशसेवेची ऊर्जा निर्माण करणे हाच मुख्य उद्देश आहे. सत्कारामध्ये त्यांना एक झाड ज्यामध्ये सर्वात जास्त ऑक्सिजन देण्याची क्षमता असते, ते दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शुभम इंगळे तर प्रमुख पाहुणे भारत नंदनवार प्रशासक नगरपंचायत बेसा, रविकांत बांधणे पीएसआय बेलतरोडी पोलीस स्टेशन यांची प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. संचालन शितल मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन कीर्ती बडोले यांनी केले.

## अमृतराव फुलाजी कोकणे गुरुजी यांच्या 59 व्या स्मृतिदिनानिमित्त संविधान परिवाराच्यावतीने अभिवादन




**नागपूर :** आंबेडकरी निष्ठावंत कार्यकर्ते रामबाग वसाहतीचे निर्माते स्मृतीशेष अमृतराव फुलाजी कोकणे गुरुजी यांच्या 59 व्या स्मृतिदिनानिमित्त संविधान परिवाराच्या वतीने अभिवादन श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अमृतरावजी कोकणे गुरुजी हे मूळचे अकोला मूर्तिजापूर येथील माना गाव छोट्याश्या खेड्यात राहत होते. ते नागपूरला पोटाची भूक भागविण्यासाठी कुटुंबाला आले तेव्हा टेकडीच्या बाजूला रिकामी जागा होती तिथे झोपड्या बांधून राहोटी सुरुवात केली. संरक्षण खात्याची जमीन असल्यामुळे झोपडपट्टी हटविली तेव्हा सर्व कुटुंब रामबाग येथे आले. या ठिकाणी झोपड्या निर्माण केल्या व रोजगार शोधून छोटेसे किराणा दुकान थाटून बसले. रामबाग झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या लोकांचे बाहेरगावून पत्र यायचे ते सर्व पत्र दुकानांमध्ये जमा करून संध्याकाळी ज्यांचे पत्र आले त्यांना बोलावून ते वाचून दाखवायचे. तसेच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ जोमात सुरू होती. डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक, प्रबुद्ध भारत, जनता या सर्व वर्तमानपत्राचे वाचन कोकणे मास्तर करायचे. अमृतराव कोकणे रिपब्लिक पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म 16/12/1922 ला झाला. त्यांनी धम्मदीक्षेच्या कार्यक्रमात मोलाचे योगदान होते. आपल्या गावाकडील लोकांना रामबागमध्ये बसवून बुद्ध धम्माची दीक्षा घेण्यास प्रवृत्त केले. त्याचप्रमाणे रिपब्लिकन पक्षाचे नेते बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे सहकारी म्हणून त्यांनी काम केले. अनेक चळवळीमध्ये त्यांनी भाग घेतला. बळीरामजी कोकणे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे विश्वासू सहकारी होते. अशा महान अमृतराव कोकणे मास्तर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी सकाळी 11 वाजता रामबाग येथे स्मृतिदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संविधान परिवार व रिपब्लिकन पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी उपस्थितीती दर्शविली.

## 605 वी डॉ. आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीसची साप्ताहिक सभा

**नागपूर :** डॉ. आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीस या सभासदांच्या घरी दैनिक बहुजन सौरभ जाईल. इतरांना घेण्यास तयार करू असे देवेंद्र घरडे यांनी सांगितले.



अध्यक्षस्थानी कवी भोला सरवर प्रमुख पाहुणे कार्यकारी संपादक विलास गजभिये, बी. टी. वाहाणे, डॉ. ॲड. बी.जे. गजभिये, देवेंद्र घरडे होते. दैनिक बहुजन सौरभने अद्यावत सामाजिक बाबीचा सर्वांगीण बाबीचा आढावा घेतला आहे. सामाजिक स्थिती पिछेहाट होण्याची कारणे लक्षात घेऊन मुख्य कारण म्हणजे वर्तमानपत्राचे माध्यम किती महत्वाचे आहे. सोबत वैचारिक पातळीवर सद्यःस्थितीत वर्तमानपत्र व सामाजिकतेची जाणीव करून देण्यासाठी दैनिक बहुजन सौरभ हे एक उत्तम वर्तमानपत्र आहे, असे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी सांगितले. प्रभाकर पानतावणे, डॉ. ॲड. बी.जे. गजभिये, बी.टी. वाहाणे, रितेश बनसोड, नरेश महाजन यांनी कथन केले. दिपा फुलेकर आदींनी मनोगत व्यक्त केले. ए.सी.जे.पी. महाराष्ट्र राज्य अध्यक्ष के.जे. चव्हाण विशेष उपस्थित होते. नविन विविध पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. संचालन प्रा. नंदा भगत, आभार डी.के. रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता संजय गजभिये, वंदना शेंडे, नांदगावे, नंदु पाटील, कांबळे यांनी सहकार्य केले.



## पावा बौद्ध विहार गोरेवाडा रोड येथेवर्षावास प्रवचन मालिकेचे उद्घाटन

**नागपूर :** नागपूर शहरात प्रवचन मालिका सुरू करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला विभागाच्या अध्यक्षा अलका चौकीकर होत्या. उद्घाटक अनिलकुमार मेश्राम होते. प्रमुख अतिथी मृणालिनी दहिवाडे, आर. एस. मेश्राम होते. या प्रसंगी बौद्ध जीवन पद्धतीत जीवन कसे जगायचे, तथागतांचा मार्ग आणि चार आर्यसत्य यावर प्रकाश टाकण्यात आला. संचालन वर्षा सहारे तसेच आभार मुनेश्वर नगराळे यांनी मानले. याप्रसंगी मनिषा जामगडे, अस्मिता देशभ्रतार, भारती पानतावणे, भारती सहारे, तृप्ती ढोके, गुंफा भगत, उषा मेश्राम, इंदिरा सोनागोते, छाया भांगे, अमिता फुलकर, पुष्पा थुल, भिमलता कांबळे, सोनाली चोखांद्रे, वंदना मेश्राम, अल्का ढोरे, निमा सरोदे आणि समस्त भा. बौ. महा. महिला विभागाच्या पदाधिकारी आणि पावा बौद्ध विहार महिला मंडळ उपस्थित होते.

## निधन वार्ता
### कमलबाई वडेट्टीवार



**नागपूर :** काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या मातोश्री कमलबाई नामदेवराव वडेट्टीवार यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या 94 वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी नागपूर येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.




# विविध संस्था संघटनांकडून स्वातंत्र्य दिन साजरा!

## संथागार फाऊंडेशन



**नागपूर :** स्वातंत्र्य दिना निमित्त संथागार फाऊंडेशन ऑफिस नागपूर येथे देशभक्ती गीत गाऊन स्वातंत्र्य दीन साजरा करण्यात आला. ना हिंदू बनेगा ना मुसलमान बनेगा, डाल डाल पर जब सोनेकी चिडिया करे बसेरा ये भारत देश है मेरा, मेरा देश मेरा सब कुछ है अशी देश भक्ती गीत नंदा पंचभाई, सुनंदा गायकवाड, मनिषा पाटील, जया कलीहारी, मंगला जांभुळे व डॉ. एम.एस. जांभूळे यांनी गायिली. डॉ. जांभुळे यांनी स्वात्रंत्र्य दिनाचे महत्व सांगितले.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व सहयोग मित्र परिवार



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व सहयोग मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने अंगुलीमाल बुद्ध विहार, मोठा इंदोरा, भीमचौक नागपूरच्या प्रांगणत स्वातंत्र्य दिनानिमित्त सकाळी 7.30 वाजता ध्वजारोहण जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आर.पी आय नेते डी एम बेलेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते अंनिस चे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे. या प्रसंगी प्रमुख अतिथी व अध्यक्षांनी स्वातंत्र्यावर आपले मनोगत व्यक्त केले. संविधान उद्धेशिकेचे सामुहिक वाचन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन लहानू बनसोड यांनी केले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला रमेश ढवळे, सुनिता ढवळे, अनिल बावनगडे, संस्थेचे सचिव टेंभुर्णे, सुभेदार मेजर कल्याण चोपडे, हवालदार शिशुपाल शहारे, नायब सुभेदार योगीनाथ जांभूळकर, हवालदार तुळशीराम गिरगुसे, हवालदार धर्मरक्षित मुरुमकर, हवालदार विजय पारधी, हंसराज इंदुरकर, निलेश पाटील, आनंद मेश्राम, चंद्रशेखर मेश्राम, विवेक निमगडे, सुधिर सोनटक्के, प्रा. पुष्पा घोडके, वर्षा साहरे, वर्षा संजीव, दिप्ती नाईक, वंदना लांजेवार, सुनिता गजभे, शिला डोंगरे, रंजना ठवरे, वंदना टेंभुर्णे, इंदिरा जांभुळकर, शिला ढोणे, शोभा तिरपुडे, चित्तरंजन चौरे व विहार परीसरातील उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका

**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका, काँग्रेस नगर रोड, तक्षशीला महाविद्यालयाजवळ अमरावती येथे देशभक्तीचा झरा वाहत असताना आणि उत्साहाचा रंग दरवळत असताना 79 वा स्वातंत्र्य दिन सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरूवात ध्वजारोहण आणि तिरंग्याला सलामी देत राष्ट्रगिताने व ज्योति बेडेकर हिने देशभक्तीपर गीताने झाली. तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रणाली घरडे हिने केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते आर. एस. तायडे होते. तर प्रमुख अतिथी डॉ. अनिल ढवळे तसेच अशोक मेश्राम, माया वासनिक गेडाम, प्रा. डॉ. कमलाकर गोवर्धन, प्रा. एसकुमार मेश्राम, प्रा. संकेत पाटील, ॲड. नितिन बिजवे इत्यादी उपस्थित होते. सर्वांनी याप्रसंगी अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या यशस्वी व उज्वल भविष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्याकरिता शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष आर. एस. तायडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, साहेबराव महाजन, निर्मला इंगळे, मंदाकिनी अभ्यंकर, राजेंद्र घरडे, उषा घरडे, रोशन पाटील, तनूश्री घरडे, पुजा भोवते, साक्षी वाढई, प्रियंका वानखडे मेश्राम, दिव्या दरडे, अनुप रंगारी, शैलेश मेश्राम, सुशांत सोनुले, आदित्य ठाकरे, गौरव मिरजकर, शालिनी पडघामोड, शुभम मेश्राम, सर्वेश शेंदरकर, संकेत गावंडे, विघ्नेश अर्मळ, केतन वानखडे, प्रिती मातकर, प्रतिभा वानखडे, प्रतिक्षा थोरात, भुषण ओबासे, कादंबरी सावरकर, ज्योती बेठेकर, संजना डोंगरे, दिले गजभिये, हर्षाली रावले, धर्मेश नंदागवळी, सपना रामचौरे, सुषमा सुलताने, प्रतिक्षा वानखडे, प्रतिक गजभिये, वैशाली मेश्राम, अश्विनी अंभोरे, नयन कावळे, जयश्री चांदेकर, सायली तायडे, राजेश गोळंबे इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभ्यासिकेचे संचालक सुरेंद्र घरडे, रमा घरडे, डॉ. कमलाकर गोवर्धन, सुरम्य घरडे यांनी परीश्रम घेतले तर आभार प्रदर्शन अश्विनी अंभोरेने केले. अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, संचालक सदस्यांची साथ आणि देशभक्तीचा दरवळणारा सुगंध यामुळे हा सोहळा खरोखरच अविस्मरणीय ठरला.




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, बहुजन हिताय संघ, ए सी जे पी, यांच्या संयुक्त विद्यमाने मिशनच्या परिसरात मिशनचे अध्यक्ष



शशीकांत हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमात मिशनचे उपाध्यक्ष ॲड. बी.जी. गजभिये, बहुजन हिताय संघाचे सचिव ॲड. हंसराज भांगे, धम्मसेविका पुष्पा बौद्ध, उस्मानाबाद विद्यापीठाचे आयुर्वेदिक महाविद्यालयांचे माजी डीन डॉ. प्रकाश खापर्डे, ए.सी.जे.पी. महाराष्ट्र प्रदेश चे कार्याध्यक्ष देवेंद्र घरडे यांचे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने प्रबोधनपर भाषणे झालीत. शशीकांत हुमणे, डॉ. प्रकाश खापर्डे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण, दीप प्रज्वलन करण्यात येऊन उपस्थित सर्वातर्फे राष्ट्रगीत म्हणण्यात आले, सभेचे उत्कृष्ट संचालन मिशनचे सचिव सी.एम. चव्हाण यांनी केले. आभार मिशनचे कोषाध्यक्ष बी.टी. वाहाणे यांनी केले. उपस्थितांमध्ये डॉ. भोला सरवर, भीमराव मेश्राम, उतम उके, मंडपे, रंगारी, जीवन गेडाम, नारायण तिरपुडे, लहू चौरे, ओंकार शेंडे, बबनराव मोटघरे, अजय वासनिक, अरूणा पाटील, वर्षा टेंभेंकर, सुरवाडे, विजय सुरवाडे, प्रभाकर पानतावणे, ढोके व मोहिले इत्यादी याप्रसंगी. सुरेश पानतावणे यांचा पुष्पा बौद्ध, शशीकांत हुमणे यांच्या हस्ते बुके देऊन सर्वांनी सुरेश पानतावणे यांचा वाढदिवस साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनचे तेजस वाघमारे, दिपक मेश्राम व बहुजन हिताय संघाच्या रोशनी वाकोडीकर यांनी परिश्रम घेतले.

## सुजाण सामाजिक बहूउद्देशीय विकास मंच



15 ऑगस्ट ला दिव्यांगांची 'स्वातंत्रदिन रॅली'

**नागपूर :** भारताचा स्वातंत्र्य दिन 15 ऑगस्ट 2025 ला दिव्यांगांची प्रथमच 'स्वातंत्रदिन रॅली' नागपूर येथील झांसी राणी चौक ते संविधान चौकापर्यंत सुजाण सामाजिक बहूउद्देशीय विकास मंच द्वारा काढण्यात आली. यात सर्व दिव्यांग मुले व मुलींनी उत्फूर्तपणे सहभाग घेतला. या दरम्यान दिव्यांग मुला मुलींना शैक्षणिक साहित्य सुद्धा उपरोक्त संस्थेतर्फे वाटप करण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, प्रोग्रेसीव्ह फेडरेशन ऑफ विज्युअल चॅलेंज यांचा पण सहभाग होता. संस्थे तर्फे इतर लोकांनी सुद्धा या रॅलीत शामिल होण्याचे आव्हाण केले होते त्यानुसार काही लोकं सुद्धा यात सामील झाले होते. या आयोजनात सामाजिक कार्यकर्ते राम अहिरवार, संजय समरीत, नागेश कानगे, छाया कुराडकर, सोनू निंबाळे, राजेश हाडके, त्रंबक मोकासारे व विठ्ठल कांबळे यांचा प्रमुख सहभाग होता.



## वानखेडे ले-आउट, घोगली

**नागपूर :** वानखेडे ले-आउट, घोगली येथील डॉ. एम. एन. जीनियस प्ले स्कूल मध्ये 79 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सिद्धार्थ खोब्रागडे, प्रो. मोहन पाटील, प्रा. स्मिता शेंडे, विभावरी शेटे, शीला गजघाटे, उषा नगराळे इत्यादी उपस्थित होते. मुख्याध्यापक सिद्धार्थ खोब्रागडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वस्तीत विद्यार्थ्यांसह प्रभात फेरी काढण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. शाळेच्या संचालिका वित्त रंगारी य प्रास्ताविक भाषण केले. वस्तीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक सिद्धार्थ खोब्रागडे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. शाळेच्या शिक्षिका तृप्ती लक्षणे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. तर निरंजना नारनवरे आभार प्रदर्शन केले.

## टेकाप सिटी गार्डन वसाहत

**नागपूर :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून टेकाप सिटी गार्डन वसाहतीमध्ये आजादीचा उत्सव अगदी आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी बाळूभाऊ घोडमारे प्रमुख नगरपंचायत बहादूरा यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष हेमचंद्र बागवान अध्यक्ष टेकऑफ क्लब कमिटी, डॉ. शारदा वैद्य सचिव, सुचिता कांबळे उपाध्यक्ष, समीर मेटेकर, किशोर भोज, हेमराज चौके हे उपस्थित होते. तसेच सीनियर सिटीजन म्हणून विनोद बाराहाते, दिलीप राऊत, बी.डी. मेश्राम, सुरज प्रकाश, सुधीर मोरे, अविनाश गोस्वामी, मिलिंद चौधरी, सुनील कोसारे, गंगाधर डोसेवान, प्रभाकर हिवरकर, प्रकाश जाधव, जितेंद्र निखार हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वज फडकवून राष्ट्रगीत आणि स्वातंत्र्यवीर यांना मानवंदना देऊन करण्यात आली. दि. 10 ऑगस्ट ला घेण्यात आलेल्या, बुद्धिबळ स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धामध्ये, विजेते ठरलेल्याना सन्मानचिन्ह, बक्षीस स्वरूपात रोख रक्कम आणि प्रमाणपत्र पाहुण्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम विजेता मेघना ढोबळे, द्वितीय रीधिमा हिरेखन, तृतीय हार्दिक समर्थ तर 16 वर्षा वयोगटाखालील बुद्धिबळ स्पर्धेमध्ये, प्रथम विजेता अनुकल्प यशवंत वासनिक, द्वितीय विशाल कोसारे तर 16 वर्ष वरील वयोगटातील, प्रथम विजेता प्रतीक सार्वे, द्वितीय समीर मेटेकर हे ठरले. कार्यक्रमाचे संचालन ज्योत्स्ना बनसोड यांनी केले असून, आभार कांचन डफरे यांनी केले. या कार्यक्रमाला टेकॉप्स परिसरातील मुले-मुली महिला- पुरुष मंडळी जास्त संख्येने उपस्थित होते.



## अ.भा. समता सैनिक दल



**नागपूर :** स्वातंत्र्य दिना निमित्त, अखिल भारतीय समता सैनिक दल (रजि.) नागपूर जिल्हा युनिटने जिल्हा अध्यक्ष राहुल सोमकुवर यांच्या अध्यक्षतेखाली उंटखाना येथील दलाच्या मध्यवर्ती कार्यालयात ध्वजारोहण समारंभ आयोजित केला. या समारंभात समता सैनिक दलाच्या सैनिकांनी राष्ट्रगीत गायन करून तिरंगा ध्वजाला सलामी दिली. या कार्यक्रमात जिल्हा अध्यक्ष राहुल सोमकुवर, जिल्हा सचिव प्रशांत आढाव, जिल्हा उपाध्यक्ष अमित इंदुरकर, रेखा रामटेके, शारीरिक प्रशिक्षक म्हैसकर आणि इतर सैनिक उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648